# मो. आरिफ (नसीम) खान

कार्याध्यक्ष : महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी
मा. मंत्री : महाराष्ट्र राज्य
सदस्य : अखिल भारतीय काँग्रेस कमिटी
अध्यक्ष : प्रचार समिती, मुंबई काँग्रेस


२५ जुलै २०२३

प्रति,

**मा. ना. श्री. एकनाथ शिंदे जी**

मुख्यमंत्री - महाराष्ट्र राज्य

मंत्रालय, मुंबई

महोदय,

तत्कालीन कॉग्रेस-राष्ट्रवादी कॉग्रेस सरकारने सन २०१४ मध्ये विविध समिति (न्यायाधीश सच्चर समिति/न्यायाधीश रंगनाथ मिश्रा/महाराष्ट्र राज्यात महमुदूर रहमान समिति) यांच्या शिफारशीनुसार **अल्पसंख्याक मुस्लिम समाजातील मागासपणाच्या आधारावर सोबत जोडलेल्या विशेष मागास प्रवर्ग अ** यादी मधील घटकांना शैक्षणिक व शासकीय नोकऱ्यामध्ये ५ % आरक्षण देण्याबाबतचे निर्णय दिनांक ०९ जुलै २०१४ रोजी घेतला व त्याचे अध्यादेश दिनांक १९ जुलै २०१४ रोजी निर्गमित केला.

महोदय, सदर आरक्षण हे धर्माच्या आधारित नसून सामाजिक, शैक्षणिक व आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या असल्याकारणाने यार्कशन देण्यात आले होत. सदर आदेशाच्या विरोधात मा. उच्च न्यायालयात PIL दाखल झाली होती तेव्हा मा. उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांनी सदर अध्यादेशातील मराठा आरक्षणाला संपूर्ण स्थगिती दिली व अल्पसंख्याक मुस्लिम समाजातील मागासलेल्या घटकांना विशेष मागास प्रवर्ग अ अंतर्गत


९, शमा अपार्टमेंट, शमशुद्दिन नगर, जरीमरी, कुर्ला-अंधेरी रोड, कुर्ला (प.), मुंबई - ४०० ०७२.
दुरध्वनी क्र.: २८५१५०५७ / २८५१६१२७ ई-मेल : officeofnaseemkhan@gmail.com

# मो. आरिफ (नसीम) खान

कार्याध्यक्ष : महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी
मा. मंत्री : महाराष्ट्र राज्य
सदस्य : अखिल भारतीय काँग्रेस कमिटी
अध्यक्ष : प्रचार समिती, मुंबई काँग्रेस




सामील करून शैक्षणिक आरक्षण बहाल केले व नोकरीकरिता दिलेल्या आरक्षणावर पुढील आदेश होईपर्यंत स्थगिती दिली. मी सन २०१४ पासून सलग ९ वर्षापासून विधानसभेत मुद्दा उपस्थित करून विषय मांडला परंतु फक्त आश्वासन भेटले त्यानंतर प्रत्येक सरकारचे मुख्यमंत्री, उप-मुख्यमंत्री यांना व्यक्तिशा भेटून, लेखी पत्र देऊन सतत **अल्पसंख्याक मुस्लिम समाजातील मागासलेल्या घटकांना सोबत जोडलेल्या विशेष मागास प्रवर्ग अ यादीनुसार आरक्षण** बहाल करण्याची मागणी करीत आहे, परंतु आज मितीपर्यंत आरक्षण बहाल न केल्याने अल्पसंख्याक समाजातील मुस्लिम विद्यार्थी-विद्यार्थिनिना शैक्षणिक क्षेत्रात आणि शासकीय नोकऱ्यांचा लाभ भेटत नसल्याने लाखों लोक बेरोजगार होत असून मुस्लिम समाजातील मागासलेल्या समाजात बेरोजगारी वाढत आहे.

महोदय, मी आपल्याकडून अपेक्षा करतो की, देशाच्या संविधानाच्या अनुषंगाने अल्पसंख्याक मुस्लिम समाजातील मागासलेल्या घटकांना विशेष मागास प्रवर्ग अ अंतर्गत सामील करून त्यांना आरक्षण बहाल करावे आणि त्यांचा मागासपणा दूर करावा जेणेकरून दुर्बल घटकात मागासलेल्या अल्पसंख्याक मुस्लिम समाजाला राज्याच्या व देशाच्या विकासात मुख्य प्रवाहात सामील करण्यात यश येईल.

धन्यवाद.

**मो. आरिफ (नसीम) खान**

प्रत रवाना

१) **मा. ना श्री. अजित पवारजी** उप मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य

२) **मा. ना श्री. देवेंद्र फडणवीस जी** उप मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य


९, शमा अपार्टमेंट, शमशुद्दिन नगर, जरीमरी, कुर्ला-अंधेरी रोड, कुर्ला (प.), मुंबई - ४०० ०७२.
दुरध्वनी क्र.: २८५९५०५७ / २८५९६१२७ ई-मेल : officeofnaseemkhan@gmail.com

शासकीय / निमशासकीय सेवांमध्ये आणि शैक्षणिक संस्थांमध्ये मुस्लिम समाजास आरक्षण देण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

## अल्पसंख्याक विकास विभाग

शासन निर्णय क्र.अविवि २०१४/प्र.क्र. ८९/का-७

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : १९ जुलै, २०१४

वाचा: सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.१४, दि.९ जुलै, २०१४.

प्रस्तावना :-

१) महाराष्ट्र राज्य हे वंचितांसाठी आरक्षणाची तरतूद करणारे अग्रेसर राज्य आहे आणि नागरिकांचे मागासवर्ग यांमधील लोकांच्या सामाजिक आणि शैक्षणिक प्रगतीकरिता राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशासाठी आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांच्या किंवा पदांच्या आरक्षणासाठी महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीपासून, महाराष्ट्र राज्यात आरक्षण धोरण अंमलात आहे.

२) भारतातील आरक्षणाच्या संकल्पनेचे जनक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या राजर्षी शाहू महाराजांनी १९०२ या वर्षी, सरकारी नोकऱ्यांमध्ये जागा राखून ठेवण्यासाठी सुरुवातीला दोन अधिसूचना काढल्या होत्या. १९०२ च्या उक्त दोन अधिसूचनांमध्ये मागासवर्ग म्हणून मुस्लिम समाजासाठी आरक्षणाची तरतूद केली होती. तत्कालिन बॉम्बे शासनाने दिनांक २३ एप्रिल, १९४२ रोजी काढलेल्या निर्णयात, सुमारे २२८ समाजाला मध्यम व मागासवर्ग म्हणून घोषित केले होते व त्या निर्णयाला जोडलेल्या सूचीमध्ये मुस्लिम समाजाला अनुक्रमांक १५५ वर दाखविण्यात आले आहे.

३) भारत सरकारने, न्यायमूर्ती सच्चर समिती नियुक्त करुन त्याद्वारे देशातील धार्मिक अल्पसंख्याक वर्गाच्या स्थितीचे विश्लेषण करण्यासाठी तपशीलवार अभ्यास पूर्ण केला आणि सच्चर समितीने, सन २००६ मध्ये भारत सरकारला आपला अहवाल सादर केला आणि शिक्षण व राज्याच्या नियंत्रणाखालील सेवा यांमध्ये संधी देऊन मुस्लिम समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी विवक्षित शिफारशी केल्या आहेत. महाराष्ट्र शासनाने दिनांक ६ मे, २००८ च्या आपल्या निर्णयान्वये,

महाराष्ट्रातील मुस्लिमांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक मागासलेपणाचा विचार करण्यासाठी आणि शासनाकडून करता येतील अशा सुधारात्मक उपाययोजना सुचविण्यासाठी डॉ.मेहम्मद-उर-रेहमान यांच्या अध्यक्षतेखाली एक अभ्यास गट गठीत केला होता. डॉ.रेहमान समितीने, सन २०१३ मध्ये सादर केलेल्या आपल्या अहवालात, इतर गोष्टींबरोबरच, राज्य शासनाच्या सेवांमध्ये व शैक्षणिक संस्थांमध्ये मागास मुस्लिमांसाठी किमान आठ टक्के आरक्षणाची शिफारस केली आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागासलेल्या मुस्लिमांना शासकीय /निमशासकीय सेवेत सरळसेवा भरतीकरिता व शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेशाकरीता आरक्षण देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती

**<u>शासन निर्णय:-</u>**

राज्यात शैक्षणिक व सामाजिक मागासलेल्या समाजासाठी भारतीय राज्य घटनेच्या अनुच्छेद १५ (४), १५(५), १६(४) व ४६ मधील तरतुदीनुसार विशेष मागास प्रवर्ग (अ) (Special Backward Category-A) निर्माण करुन त्यामध्ये सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या मुस्लिम गटाचा समावेश करण्यात येत आहे. शासन अध्यादेश क्रमांक १४ दि. ९ जुलै, २०१४ अन्वये सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागासलेल्या मुस्लिम गटासाठी विशेष मागास प्रवर्ग-अ अंतर्गत शासकीय व निमशासकीय सरळसेवा भरतीमध्ये व शैक्षणिक संस्थेतील प्रवेशासाठी ५% आरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

(अ) त्यानुसार भारतीय राज्य घटनेच्या अनुच्छेद १६ (४) मधील तरतुदीनुसार शासकीय व निमशासकीय सरळसेवा भरती मध्ये सध्या राज्यात अस्तित्वात असलेल्या आरक्षणाव्यतिरिक्त ५% आरक्षण नव्याने निर्माण करण्यात आलेल्या विशेष मागास प्रवर्ग-अ (Special Backward Category-A) या प्रवर्गाला देण्यात येत आहे.

(ब) भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद १५(१), १५ (४), १५ (५) व ४६ मधील तरतुदीनुसार शालेय शिक्षण, उच्च व तंत्रशिक्षण, वैद्यकीय शिक्षण, कृषी व पशु वैद्यकीय विभागांतर्गत शासकीय तसेच खाजगी अनुदानित व विनाअनुदानित शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशात सध्या राज्यात अस्तित्वात असलेल्या आरक्षणाव्यतिरिक्त ५% आरक्षण नव्याने निर्माण करण्यात आलेल्या विशेष मागास प्रवर्ग-अ (Special Backward Category-A) या प्रवर्गाला देण्यात येत आहे.

१. सदरचे आरक्षण भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३० च्या खंड (१) मध्ये निर्देशिलेल्या अल्पसंख्याक वर्गांच्या शैक्षणिक संस्थांना लागू राहणार नाही.

२. हे आरक्षण क्रिमीलेअर घटकांना लागू होणार नाही.

३. अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागास प्रवर्गामधील मुस्लिम समुदायातील ज्या घटकांना आरक्षणाचा लाभ यापूर्वी देण्यात आला आहे त्यांना आरक्षण पूर्वीप्रमाणे सुरु राहील व त्यांना वि.मा.प्र.-अ मधील ५% आरक्षणाचा फायदा मिळणार नाही.

४. आरक्षणाचा फायदा सोबतच्या अनुसूचीत नमूद केलेल्या मुस्लिम समाजातील एकूण ५० मागास घटकासाठी अनुज्ञेय राहील.

५. शासकीय व निमशासकीय सेवेतील सरळसेवेत आरक्षण लागू करण्याबाबतची कार्यवाही सामान्य प्रशासन विभाग (सामाजिक विकास समन्वय) यांनी करावी व त्याप्रमाणे सरळसेवेसाठी दि.२९ मार्च, १९९७ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या बिंदुनामावलीत आवश्यक त्या सुधारणा कराव्यात.

६. शासकीय व खाजगी अनुदानित व विना अनुदानित शैक्षणिक संस्थामधील प्रवेशाकरिता आरक्षण लागू करण्याची कार्यवाही अनुक्रमे शालेय शिक्षण विभाग व उच्च व तंत्र शिक्षण विभागाने करावी.

७. शासकीय व खाजगी अनुदानित व विना अनुदानित वैद्यकीय शिक्षण शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाकरिता आरक्षण लागू करण्याची कार्यवाही वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने करावी.

८. शासकीय व खाजगी अनुदानित व विना अनुदानित कृषी विद्यापीठातील व पशु वैद्यकीय शैक्षणिक संस्थामधील प्रवेशाकरिता आरक्षण लागू करण्याची कार्यवाही कृषी व पदुम विभागाने करावी.

९. सदरचे आरक्षण मा.राज्यपाल यांच्या दिनांक ९ जून, २०१४ च्या अधिसूचनेनुसार अनुसूचित क्षेत्रातील अधिसूचित पदांना लागू रहाणार नाही.

१०.आरक्षणाची अंमलबजावणी होण्यासाठी वि.मा.प्र.-अ प्रवर्गातील उमेदवारांच्या जातीचे प्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्रासंदर्भात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने आवश्यक त्या सूचना संबंधित यंत्रणेस निर्गमित कराव्यात.

विशेष मागास प्रवर्ग-अ (Special Backward Category-A) मध्ये समाविष्ट असणाऱ्या मुस्लिम समाज घटकांची अनुसूची सोबत जोडली आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१४०७१९१२२९२९१११४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Prem Singh Meena
Digitally signed by Prem Singh Meena
DN: c=IN, o=all india services, ou=IAS, postalCode=110003, st=New Delhi, cn=Prem Singh Meena
Date: 2014.07.19 14:19:57 +05'30'

(डॉ. पी. एस. मीना)
शासनाचे अपर मुख्य सचिव.

प्रत,

१. मा.राज्यपालांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३. मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव,
४. मा.मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
५. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,
६. अपर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग,
७. प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
८. सचिव, शालेय शिक्षण विभाग,
९. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
१०. प्रधान सचिव, कृषी व पदुम विभाग,
११. प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
१२. अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव / सचिव सर्व मंत्रालयीन विभाग
१३. प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई,
१४. प्रबंधक, उच्च न्यायालय (अपिल शाखा), मुंबई,
१५. बंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा),खंडपीठ,नागपूर,
१६. प्रबंधक, उच्च न्यायालय (अपिल शाखा), नागपूर,

१७. प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा),खंडपीठ औरंगाबाद,

१८. प्रबंधक, उच्च न्यायालय (अपिल शाखा), खंडपीठ औरंगाबाद,

१९. महालेखापाल, महाराष्ट्र- १ मुंबई,

२०. महालेखापाल, महाराष्ट्र- २ नागपूर,

२१. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,

२२. सर्व विभागीय आयुक्त,

२३. सर्व जिल्हाधिकारी,

२४. संचालक (प्राथमिक), शालेय शिक्षण संचालनालय, पुणे,

२५. संचालक, (माध्यमिक), शालेय शिक्षण संचालनालय, पुणे,

२६. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे,

२७. संचालक, मागासवर्ग आयोग,

२८. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,

२९. सर्व मंत्रालयीन विभाग

३०. त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्य अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांना आवश्यक त्या सूचना द्याव्यात.

३१. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय (प्रसिध्दीसाठी)

३२. निवडनस्ती.

## अनुसूची

### विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए)

| | | | |
|---|---|---|---|
| १ | धोबी मुस्लिम किंवा मुस्लिम धोबी किंवा धोबी मुसलमान. | २६ | फरुकी किंवा फारुकी. |
| २ | गराडी मुस्लिम किंवा गारोडी. | २७ | सिद्दीकी किंवा सिद्दीक. |
| ३ | नाई मुस्लिम, नावीद किंवा नावीक. | २८ | मालवी. |
| ४ | शेख किंवा शेक. | २९ | मीर. |
| ५ | मुघल किंवा मुगल. | ३० | हकीम. |
| ६ | सय्यद (सेद, सयद आणि सय्यद). | ३१ | मुल्ला किंवा मुल्लाजी, भोरी-मुल्लाजी. |
| ७ | पठाण. | ३२ | जमादार. |
| ८ | खान. | ३३ | मुकादम. |
| ९ | काद्री किंवा खाद्री. | ३४ | नकवी. |
| १० | पिरजादे किंवा पीरजादे. | ३५ | रिजवी किंवा रिज्वी. |
| ११ | मौलवी किंवा मौलाना. | ३६ | रिझवी किंवा राज्वी. |
| १२ | खाकरुब किंवा फरास. | ३७ | हुसैन किंवा हुसैनी. |
| १३ | मिर्झा. | ३८ | कामली किंवा कासमी. |
| १४ | बेग किंवा बैग. | ३९ | मेहंदी किंवा मेहदी. |
| १५ | अहमदी. | ४० | हैदरी. |
| १६ | नक्षबंदी किंवा नकाशबंदी किंवा नक्शबंदी. | ४१ | आलवी किंवा अलवी. |
| १७ | मच्छिमार मुस्लिम. | ४२ | उस्मानी. |
| १८ | तांडेल मुस्लिम. | ४३ | नूरी. |
| १९ | पटवा मुस्लिम. | ४४ | रहमानी. |
| २० | कागजी मुस्लिम किंवा कागडी मुस्लिम. | ४५ | मोहम्मदी किंवा मोहाम्मदी. |
| २१ | काझी. | ४६ | चाऊस किंवा चाउस. |
| २२ | टाकणकर. | ४७ | फकीह. |
| २३ | चिश्ती. | ४८ | सुफी किंवा वार्स किंवा अशर्फी. |
| २४ | मुस्लिम शाह. | ४९ | शूतारी किंवा सतारी मुस्लिम. |
| २५ | मुस्लिम पटेल. | ५० | ख्वाजा (अजमेरी, बग्दादी, मदनी, मक्की किंवा तुर्की). |

DATE OF RESERVING ORDER : 19 September 2014.

DATE OF PRONOUNCEMENT : 14 November 2014.

CAV ORDER: (Per Chief Justice) This group of writ petitions / public interest litigations under Article 226 of the Constitution of India challenge two separate Ordinances promulgated by the Governor of Maharashtra on 9 July 2014 providing for reservation of seats for admissions in aided and unaided educational institutions in the State and ORDER-WPL-2053-14-ORS.doc reservation of appointments / posts in public services under the State as under:-

(i) Separate 16% reservation for the Educationally and Socially Backward Category (ESBC) in which the Maratha community is included, (Maharashtra Ordinance No. XIII of 2014).

(ii) Separate 5% reservation for a newly created Special Backward Category - A (SBC - A) consisting of 50 sub-castes amongst Muslim community specified in the Schedule to the Ordinance, other than the categories of Muslims to whom reservation has already been given under other categories of backward classes and other backward classes, (Maharashtra Ordinance No. XIV of 2014).

Each Ordinance excludes the creamy layer, but the impugned reservations are, over and above the reservations aggregating to 52% reservations already provided by the Maharashtra State Public Services (Reservation for Scheduled Castes / Scheduled Tribes / Denotified Tribes (Vimukta Jatis) / Nomadic Tribes / Special Backward Category / Other Backward Classes) Act, 2001 (for short "the Reservation Act of 2001").

The petitioners have also challenged the State Government Resolution dated 15 July 2014 specifying Maratha community as the only community under Educationally and Socially Backward Category for 16% reservations under the above Ordinance No. XIII of 2014.

ORDER- WPL-2053-14-ORS.doc

2. This group of matters is heard for admission and for interim relief. We may, at the outset, briefly indicate the structure of this order for the benefit of those who do not propose to meander through the entire discussion:

I Common grounds of challenge

(a) Promulgation of impugned Ordinances - whether unconstitutional? Paras 3 to 11

(b) Whether percentage of reservations can exceed Paras 12 to 34 the ceiling limit of 50%? If so, under what circumstances? (bb) Summary Paras 32 to 34 II Challenge to 16% reservations in favour of Marathas?

(a) Contentions of parties.

(b) Whether any prima facie case made out for Paras Paras 36 & 37 38 to 58 determination of backwardness of Marathas?

(c) Whether any prima facie case made out for Paras 59 to 68 justifying increase in percentage of reservations from 52% to 68% both in educational institutions and public employment?

III Challenge to 50% reservation in favour of specified communities of Muslims

(a) Whether any prima faice case made out for Paras 69 to 79 determination of special backwardness in Specified Muslim Communities?

(b) Whether any prima facie case made out for Paras 80 to 81 increase in percentage of reservations from 52% to 57% in favour of Specified Communities of Muslims in educational institutions?

(c) Whether any prima facie case made out for Paras 82 to 84 increase in percentage of reservations from 52% to 57% in favour of Specified Communities of Muslims in public employment?

IV. Summary of Findings. Para 85

V. Interim order and Miscellaneous directions Para 86

(I) In so far as reservation in favour of specified Muslim Communities in public employment is concerned, applying the law laid down by the Constitution Benches of Supreme Court in the cases of M. Nagaraj1 and Rohtas Bhankhar2, we hold that the State has no power to breach the ceiling limit of 50% and therefore the State cannot be permitted to implement Ordinance XIV of 2014 for reservations in favour of specified Muslim Communities, in matters of public employment.

1 (2006) 8 SCC 212 2 2014 (8) SCC 872 ORDER- WPL-2053-14-ORS.doc V. INTERIM ORDER AND MISCELLANEOUS DIRECTIONS

86. In the aforesaid circumstances, we issue Rule in each petition, make it returnable on 5 January 2015 and pass the following interim order in all these petitions:

INTERIM ORDER (1) Re: Maharashtra Ordinance XIII of 2014:

(a) The operation and implementation of the impugned Maharashtra Ordinance XIII of 2014 dated 9 July 2014 and Government Resolution dated 15 July 2014 providing for 16 percent reservations in favour of Marathas is hereby stayed, pending hearing and final disposal of these petitions.

(b) However, in case, any admissions have already been granted in educational institutions till today, based on the above impugned Ordinance XIII of 2014 and the above Government Resolution, the same are not disturbed and those students will be allowed to complete their respective courses.

ORDER- WPL-2053-14-ORS.doc (2) RE : MAHARASHTRA ORDINANCE XIV OF 2014 :

(a) There shall be no stay on the implementation of Maharashtra Ordinance XIV of 2014 dated 9 July 2014 and Government Resolution dated 19 July 2014, in so far as the Ordinance and Resolution provide for 5 per cent separate reservation of seats in State owned or aided educational institutions for the newly created Special Backward Category - A comprising 50 sub-castes from amongst the Muslim community during the lifetime of the impugned Ordinance XIV of 2014 dated 9 July 2014, pending the hearing and final disposal of these petitions;

(b) However, in view of the law laid down by Bhandari, J. in the Supreme Court decision in Ashok Kumar Thakur's case (2008) 6 SCC 1, there shall be a stay on implementation of Maharashtra Ordinance XIV of 2014 dated 9 July 2014 and Government Resolution dated 19 July 2014 providing for 5 per cent separate reservation of seats in private unaided educational institutions for the newly created Special Backward Category - A comprising 50 sub-castes from amongst the Muslim community, pending the hearing and final disposal of these petitions;

ORDER- WPL-2053-14-ORS.doc

(c) In view of the law laid down by two Constitution Benches of the Supreme Court in M. Nagaraj case (2006) 8 SCC 212 and Rohtas Bhankhar's case, 2014 (8) SCC 872, there shall also be a stay on the implementation of Maharashtra Ordinance XIV of 2014 dated 9 July 2014 and Government Resolution dated 19 July 2014 in so far as they provide for 5% separate reservations for appointments / posts in public services for the Special Backward Category -

A comprising 50 sub castes from amongst the Muslim Community, pending the hearing and final disposal of these petitions.

ORDER- WPL-2053-14-ORS.doc IV. SUMMARY OF FINDINGS

85. In light of the above discussion, we summarise our prima facie findings as under:

(A) Applying the law laid down by the Supreme Court in the cases of M/s. S. K. G. Sugar Ltd.1 and T. Venkata Reddy2, we hold that motives for promulgation of Ordinances or the existence of circumstances necessitating the promulgation of Ordinances are not justiciable issues. Therefore, the challenge to the impugned Ordinances upon such grounds is rejected. (paras 3 to 11) (B) In so far as reservation of seats in State owned or aided educational institutions is concerned, applying the law laid down by the nine Judge Bench of the Supreme Court in Indra Sawhney3 and the Constitution Bench decision in Ashok Kumar Thakur's case4, we hold that such reservations ought not to exceed ceiling limit of 50%. However, in extra ordinary situation and for extra ordinary reasons the percentage of reservations may exceed the ceiling limit of 50%. But any excess over 50% shall have to be justified on valid grounds to be specifically made out by the State Government. (para 32) (C ) Following the law laid down by Bhandari, J. in the Constitution Bench decision in Ashok Kumar Thakur vs. Union of India (supra), we hold that imposing reservations on private unaided institutions constitutes an unreasonable restriction upon the fundamental right guaranteed by Article 19(1)(g) to establish and run educational institutions.

1 (1974) 4 SCC 827 2. (1985) 3 SCC 198

3. 1992 Supp. (3) SCC 217 4. (2008) 6 SCC 1 ORDER- WPL-2053-14-ORS.doc (D) In so far as reservation in public employment is concerned, applying the law laid down by the Constitution Benches of Supreme Court in the years 2006 and in July 2014, in the cases of M. Nagaraj1 and Rohtas Bhankhar2, we hold the percentage of reservations cannot be excessive, so as to breach the ceiling limit of 50%. (para 33) (E) 52% reservation in public employment has already been provided to backward classes as per the provisions of the State Reservation Act of 2001. (Para 12) (F) In light of clear and cogent findings recorded in the second backward class commission Report (Mandal Report 1990), National Commission for Backward Classes Report dated 25 February 2000 and the Report of the Maharashtra State Backward Class Commission (Bapat Report) dated 25 July 2008 and other material on record, we hold that the Maratha Community cannot be regarded as a backward class. Rather, the National Commission for Backward Classes and the Mandal Commission have concluded that the Maratha Community is a "socially advanced and prestigious community". (paras 59 to 68) (G) The Rane Committee Report suffers from several glaring flaws, which go to the root of the matter. (para 55) 1 (2006) 8 SCC 212 2 (2014) 8 SCC 872 ORDER- WPL-2053-14-ORS.doc (H) In so far as reservations for specified Muslim Communities, is concerned, there exists sufficient material or quantifiable data to sustain their classification as 'special backward class'. This material is in the form of Sachar Committee Report, Justice Ranganath Mishra Committee Report, Report of the Maharashtra State Minority Commission and Dr. Mehmood-ur- Rehman Study Group Report. Therefore, the State has made out a prima facie case for justifying 5% reservations in favour of specified Muslim Communities, in so far as admissions to State owned or aided educational institutions are concerned, even though the overall percentage of reservations is thereby increased to 57%. This is because there is a dire need to draw the muslim youth into the mainstream of secular education in the State.

87. The parties are at liberty to file further affidavits, on or before 24 December 2014.

Parties to act upon a copy of this order duly authenticated by an Associate of this Court.

CHIEF JUSTICE (M. S. SONAK, J.) After the Order is pronounced, Ms Geeta Shastri, learned Additional Government Pleader prays for stay of operation of this Order for four weeks.

ORDER- WPL-2053-14-ORS.doc In the facts and circumstances of these cases and having regard to the law laid down by the Supreme Court, we are not inclined to grant any stay as prayed for. Prayer for stay is therefore rejected.

CHIEF JUSTICE (M. S. SONAK, J.)